दै. पुण्यनगरी - 08 ऑगस्ट, 2025

# सायबर जागरूकता दिनानिमीत्त सायबर सुरक्षा विषयावर कार्यशाळा




जळगाव: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्कि क हित फाउंडेशन, पुणे यांच्यावतीने सायबर जागरूकता दिनानिमीत्त सायबर सुरक्षा या विषयावर बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळा चे उद्घाटन चे प्र-कुलगुरू प्रा एस. टी. इंगळे यांनी केले. सायबर गुन्हे दरवर्षी जास्त प्रमाणात वाढत आहे. सायबर गुन्हेगार नेहमीच नवीन मार्गांनी आपल्याला फसवण्याचा प्रयत्न करत असतात. पण आपण जर जागरूक राहिलो, थोडीशी सावधगिरी बाळगली, तर आपण या धोक्यांपासून नक्कीच सुरक्षित राहू शकतो. सायबर सुरक्षितता ही फक्त पोलिसांची किंवा तज्ज्ञांची जबाबदारी नाही, तर ती आपली प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केल्याने गुन्ह्याचे प्रमाण कमी होईल असे मत चे प्र-कुलगुरू प्रा एस. टी. इंगळे यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक मध्ये संगणक शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा आर. जे. रामटेके यांनी मनोगत व्यक्त केले. प्रथम सत्रात, पोलीस उपनिरक्षक योगेश डिकले आणि सायबर पोलीस नाईक सचिन सोनवणे यांनी ऑनलाईन गेमिंग फसवणूक, आर्थिक फसवणूक आणि इतर सायबर गुन्ह्यांविषयी सविस्तर माहिती दिली व सायबर फसवणुक झाली तर काय करावे या बदल या बदल मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात, मध्ये पोस्ट ऑफिस जळगाव जिल्हयाचे जनसंपर्क अधिकारी सिद्धेश्वर मुंढे यांनी पार्सल च्या नावाने सायबर फसवणूक कशी केली जाते व त्या पासुन आपण कसे वाचावे, व अकाउंट वर पैसे ट्रान्सफर करताना आपली कशी फसवणूक केली जाते व आपण काय काळजी घ्यावी या बदल मार्गदर्शन केले.

आभार प्रदर्शन प्रा. राजू आमले यांनी केले.सूत्रसंचालन वैष्णवी पाटील व स्नेहल पाटील यांनी केले. या वेळी प्रा राम भावसार, प्रा अजय सुरवाडे, प्रा सुरेंद्र कापसे, सायबर क्लब ऑफिसर मयूर बंडे, जानव्ही सपकाळे, नेहा पाटील, भावेश नाले, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.